# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३४२** **दिनांक ०७/१२/२०२१**

## घरामध्येच चोरी करणाऱ्या मुलास अटक -एकुण ९,०६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत.

वालीव पोलीस ठाणे हद्दित दिनांक १८/११/२०२१ रोजी सायंकाळी ०७:०० ते दिनांक ०१/१२/२०२१ रोजीचे सायंकाळी ५:३० वाजताचे दरम्यान फिर्यादी यांचे एव्हरशाईन नगरी, वालीव, वसई पुर्व येथील दरवाज्याचे लॅच मास्टर चावीने उघडून कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यावाटे घरामध्ये प्रवेश करुन एकुण १२,०६,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे, चांदीचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरुन नेला होता. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे गुरनं १३७३/२०२१ भादंवि ४५४, ४५७, ३८०, ४२७, ३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकस आणण्याचे अनुषंगाने वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे फिर्यादी यांच्या घरातील सर्व व्यक्तींकडे विचारपूस केली असता चौकशीत समजुन आले की, फिर्यादी यांच्या व्यतिरिक्त घराच्या अजून ३ वेगवेगळया चाव्या बनविण्यात आल्या होत्या. त्यापैकी एक चावी फिर्यादीचा मुलगा हा त्याची पत्नी हिचेसह एकत्र राहत असतांना घरातून गहाळ झाली होती. तसेच सदर अपराध हा बनावट चावीने दरवाजा उघडून त्यावाटे घरात प्रवेश करुन झालेला असल्याने फिर्यादीचा मुलगा नामे १) आमीर ऊर्फ मोहंमदी वैहिदुल खान याचेकडे चौकशी करण्यात आली. क्ष्यावेत्यावेळी त्याने सदर अपराध हा त्याचा मेव्हणा २) इर्शाद यार मोहंमद खाचे याचे सोबत आपसात संगणमत करुन केल्याची कबुली दिल्याने सदर आरोपीतांना गुन्हयात अटक करुन त्यांचेकडून एकुण ९,०६,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, श्री. पंकज शिरसाट, सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. कैलास बर्वे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वालीव पोलीस ठाणे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि. ज्ञानेश फडतरे, पोहवा. मनोज मोरे, मुकेश पवार, पोना. किरण म्हात्रे, राजेंद्र फड, सतीष गांगुर्डे, पो.अंम. जयवंत खांडवी, गजाजन गरीबे, सुर्यकांत मुंढे यांनी केली आहे.

---ooo---